कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या मराठा नागरिकांना ओबीसी कोट्यातून आरक्षण देताना, सगे सोयऱ्यांना या आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी राज्य सरकारनं अधिसूचना काढलेली आहे. यावर आलेल्या हरकतींची छाननी करुन अंदाजे ४ महिन्यात अंतिम निर्णय घेऊ असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केलं. मंत्रीमंडळ बैठकीनंतर मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.राज्य मंत्रिमंडळाची या आठवड्यातील तिसरी बैठक सह्याद्री अतिथीगृहात झाली. बैठकीत विविध विभागांच्या एकूण सतरा प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यात मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास आणि दंडाची रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, संगणक गुन्हे तातडीने निकाली काढण्यासाठी सेमी ऑटोमेटेड प्रोसेसिंग प्रकल्प राबविणे, गुन्ह्यांची वेगाने उकल करण्यासाठी संगणकीय न्याय सहाय्यक विज्ञान उत्कृष्टता केंद्र उभारणे तसेच राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

याशिवाय, विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात येणार असून त्यासाठी राज्य सरकार ५० कोटी भागभांडवल उपलब्ध करून देणार आहे. तर, ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेस मान्यता देण्यात आली असून त्यासाठी राज्य सरकार ५० कोटींच अनुदान देणार आहे. यासोबतचपुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी - मेंढी विकास महामंडळाच्या भाग भांडवलात भरीव वाढ करण्याचाही निर्णय मंत्रिमडळानं घेतला आहे. वृद्ध साहित्यिक, कलाकारांना ५ हजार रुपयांच मानधन, राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कल्याण केंद्रासाठी २० कोटींचा अतिरिक्त निधी, श्रीगोंदा तालुक्यातील शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करणे, जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला जिमखान्यासाठी भुलेश्वर येथील जागेच वाटप, राज्य

शिखर संस्थेच्या कळंबोलीतील्या इमारतीसाठी शुल्क माफी, १३८ जलदगती न्यायालयांसाठी वाढीव खर्चाला मान्यता, तात्पुरत्या स्वरूपातील ६४ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमित करणे, राज्यात संस्कृत, तेलुगू, बंगाली साहित्य अकादमींची स्थापना, शासकीय, निमशासकीय जागांवर मोफत चित्रीकरण आणि हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे उच्चाटनासाठी रोबोटिक स्वच्छता यंत्रे असलेली "मॅनहोलकडून मशीनहोल" कडे योजनेला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

-<><><><><>

थोर विचारवंत आणि साहित्यिक दिवंगत नरहर कुरुंदकर यांच्या नांदेड इथल्या स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामासाठी राज्य सरकारनं १४ कोटी ७८ लाख रूपये मंजूर केले आहेत. याबाबतचा शासननिर्णय आज जारी झाला.

पुणे जिल्ह्यात बारामती तालुक्यातल्या सोमेश्वरनगर इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिनस्त १०० खाटांचं आरोग्य पथक स्थापन करण्याला तसंच त्यासाठी ७७ कोटी ७९ लाख रुपयांच्या खर्चाला राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणूकीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोग आज जाहीर करणार आहे. नवी दिल्ली इथं दुपारी ३ वाजता पत्रकारपरिषदेत ओदिशा, सिक्किम, आंध्रप्रदेश आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर होईल. त्यानंतर लगेचच निवडणूक आचारसंहिता लागू होईल.

<><><><>

भ्रष्टाचार संपवण्याची भाषा करणारे नरेंद्र मोदी निवडणूक रोख्यांच्या माध्यामातून जगातलं सर्वात मोठं खंडणी वसुली रॅकेट चालवतात. असा आरोप खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज ठाण्यात पोहोचली असताना ते जाहीर सभेत बोलत होते. या सभेनंतर भारत जोडो न्याय यात्रा मुंबईकडे रवाना झाली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दक्षिणभारत दौऱ्याअंतर्गत आज तेलंगणात आहेत. तेलंगणमधे नगरकुर्नूल इथं त्यांनी आज विजय संकल्प सभेत नागरिकांना संबोधित केलं. त्यानंतर  कर्नाटकात कलबुर्गी इथं जाहीर सभा घेत आहेत.

<><><><>

प्रसारभारतीचे अध्यक्ष म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतले माजी अधिकारी नवनीत कुमार सेहगल यांनी आज पदभार स्वीकारला. सेहगल हे १९८८ च्या तुकडीतले उत्तरप्रदेश केडरचे माजी अधिकारी आहेत.

<><><><>

भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन नं ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरूष एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. लक्ष्य सेन जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानी आहे. त्यानं जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियाच्या ली झी जिया याचा २०-२२, २१-१९, २१-१९ असा पराभव केला.

<><><><>

महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये रॉयल चॅलेजर्स बंगळुरू संघानं काल गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. बंगळुरु संघानं मुंबई इंडियन्सचा पाच धावांनी पराभव केला.

//<><><><><>//